स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट/372/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 12/10/2024

---

# 1)जबरी चोरी :–

**1)भोकर :–** दिनांक 10.10.2024 रोजी चे 07.00 वा. चे सुमारास, **बटाळा कडुन किनवट रिंग रोडने भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा बटाळाकडुन किनवट रिंगरोडने भोकरकडे मोटार सायल क्रमांक एमएच–26/सीएन–2876 ने येत असतांना दोन मोटार सायकलवर तिन अनोळखी इसम येवुन फिर्यादीच्या मोटार सायकलला धडक देवुन फिर्यादीस खाली पाडुन चाकुचा धाक दाखवुन खतम करतो असी धमकी देवुन बळजबरीने फिर्यादीची बॅग ज्यामध्ये कर्जाची वसुली केलेले 55,147/–रू व पॉकेट मधील 9,000/–रू असा एकुण 64,147/–रू ऐवज जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी ऋषीकेश संतोष जाधव, वय 20 वर्षे, व्यवसाय नौकरी भारत फायनांसीयल इन्क्लूजन लि पुर्वी इंदुसलॅण्ड फायनान्सिअल लि. फिल्ड स्टॉक रा. परूडी ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 383/2024 कलम 309(4), 3(5) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री औटे, मो. नं. 9011378018** हे करीत आहेत.

**2)भोकर :–** दिनांक 16.09.2024 रोजी सायंकाळी 08.00 वा. चे सुमारास, **नागापुर जाणारे शिव रस्त्यावर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा शेतातुन घरी येत असतांना शेतातील धुऱ्यावर चार अनोळखी आरोपीतांनी फिर्यादीस चाकुचा धाक दाखवुन त्याचे जवळील नगदी 2,000/–रू व सोन्याची पाच ग्रॅमची अंगठी जु. वा. किंमती 18,000/–रू असा एकुण 20,000/–रू चा ऐवज जबरदस्तीने काढुन घेवुन थापडाबुक्याने मारहाण करून सदर घटनेचे फोटो व व्हिडीओ काढुन इतर लोकांना पाठवुन फिर्यादीची समाजात बदनामी केली. फिर्यादीची समाजात बदनामी होईल म्हणुन फिर्याद उशिराने दिल्याने गुन्हा उशिरा दाखल. वगैरे **फिर्यादी शिवाजी विठ्ठलराव कदम, वय 40 वर्षे, व्यवसाय वकिली व सामाजिक कार्यकर्ता तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शरदचंद्र पवार गट भोकर रा. नागापुर, ह. मु. अनुसयानगर भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 384/2024 कलम 309(6), 356(2) 3(5) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जाधव, मो. नं. 9022799725** हे करीत आहेत.

# 2)विवाहीतेचा छळ :–

**देगलुर :–** दिनांक 10.07.2024 रोजी ते आज पावेतो, **फिर्यादीचे सासरी मौ. गुजरी गल्ली देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी नामे मौला. फकरूदीन शेख, वय 38 वर्षे, रा. गुजरी गल्ली देगलुर यांनी फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन ट्रॅक्टर घेण्यासाठी दोल लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून तिचा शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी** 35 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 468/2024 कलम 85, 115, 352, 351(2) भा.न्या.सं–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन, **तपास पोहेकॉ/2822 कनकवळे, मो.क्रं. 9637465966** हे करीत आहेत.

# 3)गंभीर दुखापत :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 03.10.2024 रोजी 19.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घराचे बांधकामावर वसरणी ता. जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे **1.प्रेमजीत उर्फ पोलटया कांबळे, 2. विवेक गजभारे 3. दिपक उर्फ येडया कांबळे, तिघे रा. वसरणी नांदेड** यांनी संगणमत करून फिर्यादी व फिर्यादीचे भावास मागील भांडणाचे कारणावरून शिवीगाळ करून लोखंडी रॉडने मारून गंभीर दुखापत करून फॅक्चर केले. विटा मारून डोके फोडले व लाथा बुक्याने मारहाण केली. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी विशाल अन्नाराव ढवळे, वय 31 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर रा. वसरणी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 913/2024 कलम 118(2), 118(1), 115(2), 351(2), (3), 352, 3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2434 कऱ्हाळे, मो. नं. 8975822434** हे करीत आहेत.

# 4)भारतीय हत्यार कायदा :–

**1)अर्धापुर :–**दिनांक 11.10.2024 रोजी 16.50 वा. चे सुमारास, **पार्डी मक्ता शिवारात असलेल्या टोलनाक्याजवळ धनश्री कृषीसेवा केंद्रासमोर नांदेड येथे**, यातील नमुद **आरोपी नामे 1.माधव पि. आनंतराव नंदनकर, वय 26 वर्षे, व्यवसाय व्यापार पानपट्टी चालक रा. शिवनगर 2. आकाश आनंतराव साखरे, वय 25 वर्षे, रा. चिंचन नगर स्वंयवर मंगल कार्यालय छत्रपती चौक. 3.चंद्रमुनी मारोती कांबळे, वय 23 वर्षे, रा. जुनी अबादी मुदखेड जि. नांदेड** यानी विना परवाना बेकादेशीररीत्या मा. जिल्हाधिकारी यांचे शस्त्र बंदी आदेशाचे उल्लंघन करून आपले ताब्यात दोन गावठी कट्टे, चार जिवंत काडतुस व एक स्विप्ट डिझायर कार असा एकुण 3,44,500/–रू चा मुद्येमाल ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3088 बालाजी पंढरीनाथ कदम, ने. स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 540/2024 कलम 3/25 भारतीय हत्यार कायदा सह कलम 135 म. पो. का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री भोसले, मो.क्र. 7972333092** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–**दिनांक 11.10.2024 रोजी 03.00 वा. चे सुमारास, **डॉक्टर लाईन येथील हॉटेल आमृत लॉज नांदेड येथे**, यातील नमुद **आरोपी नामे राम जाधव, रा. सोमेश कॉलनी नांदेड** यानी डॉक्टर लाईन येथील हॉटेल आमृत लॉजिंग मध्ये येवुन मला लॉज मध्ये थांबण्यासाठी रूमचे पैसे का मागता म्हणुन फिर्यादीस अश्लील शिवीगाळ करून कमरेस असलेली तलवार काढुन धमकी दिली. सदर तलवार आरोपीने विना परवाना बेकादेशीररीत्या ताब्यात बाळगला. वगैरे **फिर्यादी बाबाराव पि. नंदिराम मोरे, वय 27 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. पिंपळगाव (कोरका) ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 409/2024 कलम 296, 351(2), (3), सह कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बिक्कड, मो.क्र. 8600740190** हे करीत आहेत.

# 5)जुगार :–

**कंधार :–** दिनांक 10.10.2024 रोजी चे 23.30 वा. चे सुमारास, **नवी आबादी येथील मोकळया जागेत मौ. कुरूळा ता. कंधार जि. नांदेड येथे**, यातील आरोपी नामे 1.रोहीत राजेश कांबळे, वय 32 वर्षे, 2. किरण संजय ढवळे, वय 28 वर्षे, 3. नेहरू अर्जुन ढवळे, वय 29 वर्षे, 4. मगदुम सय्यद अजम आली, वय 27 वर्षे, 5.संजय मोतीराम ढवळे, वय 48 वर्षे, 6. विठ्ठल निवृती टोम्पे, वय 65 वर्षे, सर्व रा. कुरुळा ता. कंधार जि. नांदेड यांनी विना परवाना बेकायदेशिररीत्या गोलाकार बसुन तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 12,740/–रू व पाच मोबाईल, दोन मो. सा. असा एकुण 1,53,240/–रू मुद्येमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/820 नामदेव तुकाराम वानरे, ने. पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे कंधार** गुरनं 334/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2259 श्रीरामे, मो. नं. 9421761652** हे करीत आहेत.

# 6)प्रोव्हिबीशन :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 11.10.2024 रोजी चे 15.45 वा. चे सुमारास, **देवकृपा फंक्शन हॉल समोर नांदेड येथे**, यातील आरोपी नामे **राजकुमार दिगंबर तिडके, वय 32 वर्षे, व्यवसाय हॉटेल चालक रा. देगाव बु. ता. अर्धापुर** जि. नांदेड यांनी विना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 7120/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री संग्राम व्यंकटी केंद्रे, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 505/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2309 जाधव, मो.नं. 9049343095** हे करीत आहेत.

**2)भोकर :–** दिनांक 11.10.2024 रोजी 11.30 वा. चे सुमारास, **मौ. थेरबन शिवारातील सुधा नदी पुलाजवळ ता. भोकर जि. नांदेड येथे**, यातील आरोपी नामे **संभा माधव महाजन, वय 54 वर्षे, रा. विरसनी ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी विना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 6400/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2820 भिमराव उमला जाधव, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 382/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/926 कळणे, मो.नं. 9923004511** हे करीत आहेत.

**3)देगलुर :–** दिनांक 11.10.2024 रोजी 15.30 वा. चे सुमारास, **नवी आबादी शेवाळा ता. देगलुर जि. नांदेड येथे**, यातील आरोपी नामे संभा **शिवाजी नारायण बासटवार**, वय 42 वर्षे, **रा. शेवाळा ता. देगलुर जि. नांदेड** यांनी विना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 4500/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/142 भारत खंडु फंताडे, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 470/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2462 केंद्रे, मो.नं. 9923692462** हे करीत आहेत.

# 7)विषारी औषध पिऊन आत्महत्या :—

**उमरी :—**दिनांक 04.10.2024 रोजी 11.30 वा. चे सुमारास, **मयताचे शेतामध्ये शेलगाव शिवार ता. उमरी जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे प्रताप पुंडलक कदम, वय 46 वर्षे, रा. शेलगाव ता. उमरी जि. नांदेड**, यांनी सततचे नापीकीस व कर्जाला कंटाळुन कोणतेतरी विषारी औषध पिल्याने स. द. विष्णुपूरी नांदेड येथे दाखल केले असता उपचारा दरम्यान मरण पावला. वगैरे **खबर देणार पोहेकॉ/280 डब्लु के कांबळे, नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे उमरी** आ. मृ. 38/2024 कलम 194 भारतीय नागरीक संहीता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1985 श्री जी. बी. शिंदे, मो. नं. 7721005064** हे करीत आहेत.

# 8)ऱ्हदय विकाराने होमगार्डचा मृत्यु :—

**कंधार :—**दिनांक 11.10.2024 रोजी चे 06.40 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना कंधार येथे**, यातील **मयत नामे रामचंद्र मुकिंदा गंधपलवाड, वय 55 वर्षे, व्यवसाय होमगार्ड नौकरी रा. नवरंगपुरा कंधार ता. कंधार जि. नांदेड**, हे दुर्गादेवी उत्सव बंदोबस्त करून रात्री घरी गेले असता दिनांक 11.10.2024 रोजी 06.00 वा. चु सुमारास त्यांचे छातीत त्रास होत असल्याने त्यांना स. द. कंधार येथे शरीक केले असता तेथील डॉक्टरांनी मरण पावल्याचे घोषीत केले. वगैरे **खबर देणार गणपत पि. रामचंद्र गंदपलवाड, वय 40 वर्षे, व्यवसाय मासेमारी रा. नवरंगपुरा कंधार ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कंधार** आ. मृ. 57/2024 कलम 194 भारतीय नागरीक संहीता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2059 सानप, मो. नं. 9421849989** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड